मारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/४४**
**डीएनबीएस(पीडी).सीसी.क्र.३४२/०३.१०.००१/२०१३-१४**

जुलै १, २०१३

सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या(एनबीएफसी)

महोदय,

**महापरिपत्रक - कॉर्पोरेट गव्हर्नन्स**

ह्या विषयावरील सर्व सूचना एकाच जागी मिळव्यात ह्यासाठी, रिझर्व बँकेने जून ३०, २०१३ अखेरपर्यंतच्या सर्व सूचना एकत्रित केल्या आहेत. येथे नोंद घ्यावी की, जोडपत्रामधील अधिसूचनांमधील ह्या विषयाशी संबंधित असलेल्या सर्व सूचना अद्यावत करुन ह्या महापरिपत्रकात एकत्रित करण्यात आल्या आहेत. हे महापरिपत्रक आरबीआयच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in). टाकण्यात आले आहे.

आपला

एन एस विश्वनाथन

प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक

## अनुक्रमणिका

| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| I | <u>कॉर्पोरेट गव्हर्नन्सवरील मार्गदर्शक तत्वे</u> |
| 1. ऑडिट कमिटीची स्थापना | |
| 2. नामांकन समिती स्थापन करणे | |
| 3. जोखीम व्यवस्थापन समिती स्थापन करणे | |
| 4. प्रकटीकरण व पारदर्शकता | |
| 5. संबंधित कर्जप्रदान | |
| II | (२) रु. ५० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक ठेवी/सार्वजनिक ठेवी असलेल्या, स्टॅट्युटरी ऑडिटर्स-कंपन्या ह्यांच्या भागीदारांचे परिवलन (रोटेशन) |
| परिशिष्ट | |

## कॉर्पोरेट गव्हर्नन्सवरील मार्गदर्शक तत्वे

गेल्या अनेक वर्षात चांगल्या प्रतीचे कॉर्पोरेट गव्हर्नन्स असण्याची गरज अत्यंत महत्वाची ठरलेली आहे. जागतिक पातळीवरही, गुंतवणुकदारांचा तसेच अन्य ग्राहकांचा विश्वास वाढविण्यासाठी कंपन्या उत्तम प्रकारच्या कॉर्पोरेट कार्यरीतींचा अवलंब करीत आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रामधील ग्राहकांचे हितसंबंध जपण्यासाठी कॉर्पोरेट गव्हर्नन्स हीच गुरुकिल्ली आहे. एनबीएफसीही कॉर्पोरेट संस्था असल्याने जागतिकदृष्ट्या लागु असलेले कॉर्पोरेट गव्हर्नन्स त्यांनाही लागु पडते. नोंदणीकृत एनबीएफसी, ज्यांना सेबीने केलेले नोंदणी-करार व नियम पाळणे आवश्यक आहे, त्यांना कॉर्पोरेट गव्हर्नन्सबाबत सेबीने विहित केलेल्या अटींचे पालन अरणे आवश्यक आहे.

एनबीएफसींना त्यांच्या कार्यकृतीत अधिकतर पारदर्शकता आणता यावी आणि सर्वोत्कृष्ट कार्यरीती अवलंबिता याव्यात ह्यासाठी, रु २० कोटी व त्यापेक्षा अधिक ठेवी स्वीकारणाऱ्या एनबीएफसींच्या, तसेच ठेवी न स्वीकारणाऱ्या व ॲसेट-साईझ रु १०० कोटी व त्यापेक्षा अधिक असलेल्या एनबीएफसींच्या (एनबीएफसी-एनडी-एसआय) संचालक मंडळांच्या विचारार्थ पुढील मार्गदर्शक तत्वे प्रायोजित होत आहेत.

### १. ऑडिट कमिटीची स्थापना

१) विद्यमान निदेशांनुसार, शेवटच्या ताळेबंदानुसार, रु ५० कोटी व त्यापेक्षा अधिक ॲसेट्स असलेल्या एनबीएफसींना, त्यांच्या संचालक मंडळाचे किमान तीन सभासद असलेली ऑडिट कमिटी तयार करणे आवश्यक होते व ही अट तशीच ठेवण्यात आली आहे.

२) ह्याशिवाय, रु २० कोटी व त्यापेक्षा ॲसेट्स असलेल्या एनबीएफसी-डी अशाच प्रकारे ऑडिट कमिटी तयार करु शकतात.

### २. नामांकन समिती स्थापन करणे

"सक्षम व सुयोग्य" अर्हता असलेल्या संचालकांची नेमणुक केली जाणे हे आर्थिक क्षेत्रात अत्यंत महत्वाचे समजले जाते. आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४५ आयए (४) (क) अन्वये, अबँकीय वित्तीय कंपनीचा व्यवसाय करण्यासाठी पंजीकरण प्रमाणपत्र देण्याचा विचार करतेवेळी, त्या अबँकीय वित्तीय कंपनीच्या व्यवस्थापनाचा किंवा प्रायोजित व्यवस्थापनाचा सर्वसाधारण हेतु/दृष्टिकोन हा विद्यमान आणि भावी ठेवीदारांसाठी कलुषित करणारा नाही ह्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. ह्या क्षेत्रातील निरनिराळ्या संस्थांच्या हितसंबंधांचा विचार करता, रु २० कोटी व अधिक ठेवी असलेल्या एनबीएफसी-डी आणि एनबीएफसी-एनडी-एसआय ह्यांनी, प्रायोजित/विद्यमान संचालकांची गुणवत्ता "सक्षम व सुयोग्य" असल्याची खात्री करुन घेण्यासाठी नामांकन समिती तयार करावी.

### ३. जोखीम व्यवस्थापन समिती स्थापन करणे

रु २० कोटी किंवा अधिक सार्वजनिक ठेवी असलेल्या किंवा शेवटच्या ताळेबंदानुसार रु १०० कोटी किंवा अधिक ॲसेट्स असलेल्या एनबीएफसींसाठी बाजार-जोखमीवर नजर ठेवण्याचे काम ॲसेट लायाबिलिटी मॅनेजमेंट कमिटी (एएलसीओ) करत असते. आणि ती, ॲसेट लायाबिलिटीमधील फरकावर देखरेख ठेवण्यासाठी व संबंधित जोखीम कमी करण्यासाठी कार्यकृती देण्यासाठी स्थापन केली जाते. अशा एकत्रित जोखमीचे व्यवस्थापन करण्यासाठी, वरील प्रकारच्या एनबीएफसींसाठी, एएलसीओच्या व्यतिरिक्त जोखीम व्यवस्थापन समिती स्थापन केली जावी.

### ४. प्रकटीकरण व पारदर्शकता

ह्याबाबत संचालक मंडळाने विहित केल्यानुसार, एनबीएफसीद्वारा, नियमित कालाने पुढील माहिती संचालक मंडळाला सादर केली जावी :-

- सातत्याने असलेली जोखीम व्यवस्थापन प्रणाली व जोखीम व्यवस्थापन धोरण जारी करण्याबाबत केलेली प्रगती व करावयाचे डावपेच
- कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या मापदंडांचा अंगिकार, उदा. निरनिराळ्या समित्यांची स्थापना, त्यांच्या भूमिका/उद्देश व कार्ये, सभांची नियतकालिक, आणि त्यांची व्याप्ती व आढावा घेतला जाणे इत्यादि.

**५. संबंधित कर्जप्रदान**

संबंधित कर्ज प्रदानाबाबत सूचना असलेल्या परिच्छेद २(६) च्या संदर्भात दिनांक मे ८, २००७ च्या, कर्ज प्रदानाबाबतच्या सूचना असणाऱ्या परिपत्रकाबाबत बँकेकडे, सूचना आल्या आहेत. ह्या सूचनांचा अभ्यास करण्यात येत असून, ह्या सूचनांचे मूल्यांकन व बदल अंतिम झाल्यानंतर, आवश्यकता वाटल्यास वरील परिपत्रकाच्या परिच्छेद २ (६) मधील सूचना कार्यवाहीत येतील.

वरील मार्गदर्शक तत्वांच्या मूलहेतूला धक्का न पोहचविता, ह्या मार्गदर्शक तत्वांची व्याप्ती वाढेल अशा प्रकारे, एनबीएफसी त्यांची अंतर्गत मार्गदर्शक तत्वे तयार करतील. आणि त्यांच्या निरनिराळ्या ग्राहकांच्या माहितीसाठी ती त्या कंपनीच्या वेबसाईटवर टाकली जातील.

**(२) रु. ५० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक ठेवी/सार्वजनिक ठेवी असलेल्या, स्टॅट्युटरी ऑ डिटर्स-कंपन्या ह्यांच्या भागीदारांचे परिवलन (रोटेशन)**

गेल्या अनेक वर्षांमध्ये, चांगल्या प्रकारच्या कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या गरजेला अधिकाधिक प्राधान्य देण्यावर भर दिली जात आहे. निवेशकांचा तसेच इतर ग्राहकांचा विश्वास वाढविण्यासाठी जगभरातील कंपन्या सर्वोत्तम कॉर्पोरेट कार्यरीतींचा स्वीकार करत आहेत. नियतकालिकतेने परिवलन केले जात असलेल्या ऑडिटर्सद्वारे लेखा-पुस्तकांची छाननी केली जाणे हे कॉर्पोरेट गव्हर्नन्सला अधिक सशक्त करील.

(२) ह्या संदर्भात, सार्वजनिक ठेवी / रु. ५० कोटी व त्यापेक्षा अधिक रकमेच्या ठेवी असलेल्या एचबीएफसींनी, त्यांच्या कंपन्यांच्या हिशेब तपासणीसाठी नेमलेल्या ऑडिट कंपन्यांच्या भागीदारांचे परिवलन करण्याबाबत अट घालणे स्पृहणीय ठरेल. त्या कंपनीचे सातत्याने तीन वर्षांपेक्षा अधिक काळ ऑडिट करणा-या चार्टर्ड अकाऊंटटंसच्या कंपनीच्या भागीदारांसाठीही ही अट लागु करणे इष्ट आहे. तथापि, त्या एनबीएफसीने तसेच ठरविल्यास असा परिवलित भागीदार, तीन वर्षानंतर त्या कंपनीचे ऑडिट करण्यास पात्र ठरेल. ऑडिटर्स कंपन्यांच्या नेमणुक-पत्रांमध्ये, ह्याबाबतचे अनुपालन करण्याबाबत कंपन्या योग्य त्या अटी समाविष्ट करु शकतात.

## परिशिष्ट

| अनु. क्र. | परिपत्रक क्र. | दिनांक |
|---|---|---|
| १. | डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र.६१/०२.८२/२००५-०६ | डिसेंबर १२, २००५ |
| २. | डीएनबीएस.पीडी/सीसी.९४/०३.१०.०४२/२००६-०७ | मे ८, २००७ |
| ३. | डीएनबीएस.पीडी/सीसी.१०४/०३.१०.०४२/२००७-०८ | जुलै ११, २००७ |